# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२० ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# बालकांच्या पोषण आहाराचा तांदूळ रिपॉलिशिंग करताना पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांची धडाकेबाज कारवाई

## महाराष्ट्र, पंजाब सरकारचा तांदूळ रिपॉलिशिंग करून विक्री करणाऱ्या गोडाऊनवर कारवाई



## तांदळाची काळ्याबाजारात विक्री करणारे रॅकेट उघडकीस



**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

वाळूज एमआयडीसी परिसरातील करोडी येथे पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांच्या पथकाने तांदूळ प्रक्रिया करणाऱ्या कंपनीवर शनिवारी (१) फेब्रुवारी) छापा मारला, या ठिकाणी महाराष्ट्र आणि पंजाब सरकारचे शिक्के असलेल्या गोण्यांमध्ये हजारो टन तांदूळ आढळून आला. विशेष म्हणजे या ठिकाणी स्तनदा मातांसाठी असलेल्या पोषण आहाराच्याही बॅगा आढळून आल्या. सुमारे दररोज ५ ते ६ ट्रक तांदूळ उतरवला जाऊन तीनपेक्षा अधिक गाड्या विक्रीसाठी बाहेर जात असल्याची माहिती कामगारांनी दिली.

करोडी शिवारातील गट क्रमांक १११ मध्ये श्री गजानन अँग्रो, सेल्स कॉर्पोरेशन या धान्य व कडधान्याच्या व्यापाऱ्याचे चार मोठ्या शेडमध्ये गोडाऊन आहेत. या गोडाऊनचे मूळ मालक मंगेश जाधव असून त्यांनी २०१८ मध्ये मुंबई येथील संजय अग्रवाल यांना हे गोडाऊन दहा वर्षांच्या करारावर किरायाने दिलेले आहे. अग्रवाल हे या ठिकाणी श्री गजानन अ‍ॅग्रोच्या नावाखाली व्यवसाय करीत असल्याचे समोर आले आहे. गोडाऊनमध्ये गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्र शासन आणि पंजाब राज्यातील तांदूळ, डाळीचा साठा आणून, रिपॉलिश करून त्याची बाहेरील राज्यात आणि देशात विक्री होत असल्याची माहिती उपायुक्त नितीन बगाटे यांना मिळाली होती. या माहितीनुसार उपायुक्त बगाटे आणि पथकाने



या गोडाऊनवर शनिवारी दुपारी पावणेतीन वाजता छापा टाकला.

**पॉलिश करुन प्रीमियम म्हणून विक्री**

तांदळाची गाडी रिकामी केल्यानंतर त्याला चाळण्यांतून चाळले जात असे. यातून निघणाऱ्या तांदळाचे प्रीमियम, शाबूत, अर्घा आणि चुरा अशा चार प्रकारच्या क्वालिटीमध्ये वर्गीकरण केले जात होते. त्याला पाण्यातून काढत सुकवले जायचे. सुकल्यानंतर तांदळाला पॉलिशिंग करण्यात येत होती. याची २५ किलोच्या पॉकेटमध्ये पॅकिंग करून विक्री होत होती. महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास योजनेसाठी पुरवला जाणारा तांदूळ आणि डाळीच्या पॅकेटचा साठा आढळून आला. यावर ठळकपणे 'महाराष्ट्र शासन' असा लोगो आहे. स्तनदा माता, गरोदर महिला आणि किशोरवयीन मुलींसाठी एनर्जी डेन्स मूग डाळ, तसेच ३ महिने ते ३ वर्षाच्या मुलांसाठी पोषण आहाराचा साठा यामध्ये आढळून आला आहे.

### आढळलेले धान्य एफसीआयचे

या गोडाऊनमध्ये आढळून आलेले धान्य रेशनचे नाही. गोडाऊनमध्ये असलेले धान्य एफसीआयचे असल्याचे दिसत आहे. पंचनामा सुरू असून पूर्ण झाल्यावरच सत्य काय आहे ते समोर येईल, आम्ही सॅम्पल घेऊन लॅबला देऊ,

**-प्रवीण फुलारी,**
जिल्हा पुरवठा विभाग,
छत्रपती संभाजीनगर

# अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मध्यमवर्गीयांसाठी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. आता १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागणार नाही

नवी दिल्ली : दुर्लक्षित मध्यमवर्गाची अर्थसंकल्पात दखल; १२ लाखांपर्यंतचा प्राप्तिकर संपूर्ण करमुक्त करत नोकरदारांना मोठा दिलासा. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाची घोषणा केल्यानंतर, शनिवारी संसदेत मांडलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने वार्षिक १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त करून देशातील तमाम मध्यमवर्गीयांना खूश केले.

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाची घोषणा केल्यानंतर, शनिवारी संसदेत मांडलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने वार्षिक १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त करून देशातील तमाम मध्यमवर्गीयांना खूश केले. केंद्रातील 'एनडीए' सरकार गरीब, शोषित-वंचितांच्या कल्याणाची भाषा सातत्याने करत असले तरी, अत्यंत निष्ठावान मतदार मानल्या गेलेल्या म ध्यमवर्गाकडे दुर्लक्ष होत असल्याच्या आरोपांना यंदाच्या अर्थसंकल्पातून तगडे प्रत्युत्तर दिल्याचे मानले जात आहे.

२०२४ मधील लोकसभा निवडणुकीच्या लेखानुदानामध्ये करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेमध्ये वाढ करून मध्यमवर्गीयांना दिलासा दिला जाईल ही आशा फोल ठरली होती. या निवडणुकीमध्ये 'एनडीए'ला फारसे यश न आल्याने यंदा अर्थसंकल्पाम ध्ये मध्यमवर्गावर 'रेवड्यां'ची खैरात होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या भाषणात मध्यमवर्गाचा सातत्याने उल्लेख केला. 'एनडीए' सरकारने २०१२ नंतर करदात्यांना दिलेली ही सर्वाधिक कर-सवलत असून या निर्णयामुळे उपभोग खर्चात वाढ होऊन बाजारपेठीय अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



**कृषीक्षेत्रासाठी सहा नव्या योजना**

**विकासदराचा उल्लेख टाळला!**

अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राजकोषीय तुटीबरोबरच विकासदराचा आकडाही दिला जातो. सीतारामन यांनी राजकोषीय तूट ४.४ टक्क्यांपर्यंत नियंत्रित ठेवण्याचे ध्येय व्यक्त केले, मात्र विकासदराचा उल्लेख टाळला. अर्थसंकल्पाच्या दस्तऐवजामध्ये नाममात्र विकासदर १०.१ टक्के अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पुढील आठवड्यात नवे प्राप्तिकर विधेयक - केंद्र सरकारने करप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला असून पुढील आठवड्यामध्ये नवे प्राप्तिकर विधेयक संसदेत मांडले जाणार आहे. त्याद्वारे करपद्धती अधिक सुलभ होईलच पण, कायद्याची भाषादेखील सोपी केली जाईल. न्यायसंहितांच्या धर्तीवर करप्रणालीही न्यायाधारित असेल, असा दावा सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केला.

सलग आठवा अर्थसंकल्प! - अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेमध्ये सलग आठवा अर्थसंकल्प सादर केला.

यंदाचे त्यांचे ७५ मिनिटांचे भाषण सर्वांत छोटे ठरले. गेल्या वर्षी त्या सुमारे दीड तास बोलल्या होत्या. मुद्दे संक्षिप्तपणे मांडताना सविस्तर माहितीसाठी सीतारामन भाषणात अनुच्छेदाच्या क्रमांकांचा उल्लेख करत होत्या. त्यामुळे सीतारामन यांचे भाषण आटोपशीर झाले.

विकसित भारत व चार आधारस्तंभ! - गेल्या अर्थसंकल्पाप्रमाणे यंदाही सीतारामन यांनी २०४७ पर्यंत 'विकसित भारता'चे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. विकसित भारत पूर्णपणे गरिबीमुक्त असेल, सर्वांना दर्जेदार शिक्षण आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा मिळेल, असे सीतारामन म्हणाल्या. पंतप्रधान मोदींनी उल्लेख केलेल्या गरीब, शेतकरी, महिला व युवा या चार आधारस्तंभांचा समावेश असेल.

# महाकुंभमेळ्याला गालबोट

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे महाकुंभमेळ्याला गालबोट लागले. महाकुंभमेळ्यासाठी देशाच्या कानकोपऱ्यांतून तसेच विदेशातूनही भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. भाविकांची ही संख्या हजारोंच्या नाही तर लाखोंच्या नाही तर करोडोंच्या घरात असल्याने प्रशासकीय यंत्रणेवर ताण निर्माण होणे स्वाभाविक आहे. प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात सहभागी होणाऱ्या करोडो भाविकांची संख्या पाहता उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजनाची खरोखरीच प्रशंसा करावी तितकी कमीच आहे. महाकुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांनीदेखील चेंगराचेंगरी होणार नाही, दुर्घटना घडणार नाही, याबाबत सतर्कता बाळगणे आवश्यक होते. देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांचे प्रयागराज भूमीवर कोणत्याही आवाहनाशिवाय किंवा निमंत्रण न देता ज्या कारणाने आगमन होते, ते निमित्त म्हणजे महाकुंभमेळा.

पद्मपुराणानुसार कुंभोत्सवाच्या दिव्य संगमाच्या वेळी प्रयागराजमध्ये स्नान करणाऱ्या भाविकांना जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती मिळते, म्हणून या पवित्र ठिकाणी जाऊन स्नान, दर्शन आणि दान केल्याने भाविकांना पुण्य लाभ होतो. कुंभ राशीची गणना तीन प्रमुख ग्रहांच्या आधारे केली जाते. कालचक्रमध्ये ग्रहांचा राजा, सूर्य, राणी चंद्र आणि ग्रहांचा गुरू याला महत्त्वाचे स्थान आहे. या तीन ग्रहांचे विशिष्ट राशींमध्ये होणारे संक्रमण हा कुंभ उत्सवाचा मुख्य आधार असतो. प्रयागराजमध्ये, गुरू वृषभ राशीत आणि सूर्य मकर राशीत असल्याने, माघ महिन्यातील अमावस्येच्या दिवशी चंद्राचा मकर राशीत प्रवेश हा अत्यंत दुर्मीळ योगायोग निर्माण करतो. महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला अनन्यसाधारण महत्त्व असते. या मौनी अमावस्येला महाकुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी देशविदेशातील कोट्यवधी भाविक सहभागी झाले होते. त्यातच चेंगराचेंगरी झाली. ३० हून अधिक भाविकांचा मृत्यू झाला, शंभराहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. हा प्रशासकीय आकडा असला तरी यात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांच्या वारसांना उत्तर प्रदेश सरकारकडून ५० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. ही दुर्घटना घडल्यावर उत्तर प्रदेश सरकारने ज्या प्रकारे पावले उचलली, प्रशासकीय यंत्रणा राबविली, परिस्थितीवर नियंत्रण मिळविले, या सर्व घटना खरोखरीच प्रशंसनीय आहेत. मुळात कुंभमेळ्यात सहभागी कोट्यवधी भाविकांची संख्या, त्यात झालेली चेंगराचेंगरी, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी योगी सरकारने राबवलेली पोलिसी यंत्रणा व जखमींवरील उपचारासाठी आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी राबविलेली यंत्रणा, जखमींना रुग्णालयापर्यंत विनाविलंब पोहोचविण्यासाठी काही मिनिटांमध्ये निर्माण केलेले स्वतंत्र कॉरिडॉर या एखाद्या चित्रपटातील कथानकाला साजेसे दृश्य योगी सरकारने वास्तवात साकारले.

उत्तर प्रदेशचे पोलीस, आरोग्य यंत्रणा, रस्ते व्यवस्था सांभाळणारे वाहतूक पोलीस आणि या सर्वांवर संचलन करणारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी तसेच या सर्वांचा वेळोवेळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाकुंभ मेळ्यातील दुर्घटनेनंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजनेतील खरे 'देवदूत' ठरले आहेत, असे म्हणणेदेखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. महाकुंभमधील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर पंतप्रधान मोदी सातत्याने मुख्यमंत्री योगी यांच्या संपर्कात होते. जखमींच्या उपचाराबाबत माहिती जाणून घेत होते. दिवसभरातील व्यस्त कार्यबाहुल्यातूनही त्यांनी उत्तर प्रदेशातील घडामोडींवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले होते. रवी, चंद्र व गुरू हे गोचरमध्ये विशिष्ट पद्धतीने योग जुळून येतो त्या त्या योगावर त्या ठिकाणी कुंभमेळा भरतो. कधी सहा वर्षे, तर कधी बारा वर्षे, तर कधी १४४ वर्षांनी हे योग येत असतात. आता जर असा योग सहा वर्षांनी आला तर त्यास अर्धकुंभ मेळा म्हणतात. जर असा योग बारा वर्षांनी आला तर तो पूर्ण कुंभ म्हटला जातो आणि असा योग जर १४४ वर्षांनी आला तर तो महाकुंभ मेळा म्हटला जातो. जानेवारी २०२५ मध्ये उत्तर प्रदेशच्या प्रयागराजच्या भूमीवर सुरू असलेला महाकुंभमेळा हा देखील १४४ वर्षांनीच आला असल्याने देशविदेशातील कोट्यवधी भाविकांचे या ठिकाणी आगमन झाले होते. भाविकांच्या स्नानासाठी उत्तर प्रदेश सरकारने प्रयागराज परिसरात असंख्य कुंडांची निर्मिती केली होती. बुधवारी मौनी अमावस्येला अमृतस्नानापूर्वी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी दिवसभर मोठ्या प्रमाणात जनसमुदाय त्रिवेणी संगम परिसराकडे जात असल्याने ही दुःखद घटना घडली. ही चेंगराचेंगरी प्रयागराजमधील संगम घाटाजवळ घडली. संगम घाट हे नाव या ठिकाणाच्या आकारामुळे पडले आहे.

हे संगम घाट प्रयागराजमध्ये स्नानासाठी सर्वात महत्त्वाचे स्थान मानले जाते. असे म्हणतात की येथेच यमुना आणि सरस्वती नदी गंगेला मिळते. या ठिकाणी बहुतेक साधू-मुनी स्नान करतात. भाविकही या ठिकाणी स्नानाला सर्वाधिक महत्त्व देतात. उत्तर प्रदेश सरकारने भाविकांच्या स्नानासाठी शेकडोंच्या संख्येने घाट बनविले असतानाही संगम घाटावरच स्नान करण्याचा भाविकांचा मोह या दुर्घटनेस प्रामुख्याने कारणीभूत ठरला आहे.

# एस.टी.च्या भोंगळ कारभाराकडे परिवहन मंत्री लक्ष देणार का ?

**महाराष्ट्र** राज्य मार्ग परिवहन मंडळाने प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन लांब पल्ल्यासाठी लालपरीशिवाय नवीन ई बसेच, शिवशाही, शिवनेरी अशा वातानुकुलित आरामदायी बसेस प्रवाशांसाठी आणल्या खऱ्या पण एस. टी. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणा आणि बेजबाबदारपणामुळे त्यातल्या त्यात यांच्यावर कोणाचाही वचक नसल्यामुळे प्रवाशांना अनेकदा मनस्ताप सहन करावा लागतो.

आज तारखेला विशेषतः वातानुकुलित गाड्यांबाबत मंत्री महोदयाचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. या गाड्यांमध्ये साफसफाईची मोठी समस्या जाणवते.

कोणत्याही आगारातून वेळेवर गाड्या न सोडणे ही तर नित्याचीच बाब झालेली आहे. याशिवाय महत्वाची बाब म्हणजे एस.टी.कडून ऑनलाईन आरक्षणाची सोय उपलब्ध आहे. बरेच प्रवाशी शिवशाहीसारख्या गाड्यांची एक एक आठवडा अगोदर आरक्षण करतात. पण अनुभव असा आहे की, त्यांच्या तिकीटावर नमुद केलेल्या वेळेत कधीही गाडी मिळत नाही. एक तर गाडी एक दोन तास उशिरा येथे किंवा ती गाडी रद्द होते. रद्द झालेल्या गाडीनंतर दुसरी गाडी तेथील आगार प्रमुख किंवा स्थानक प्रमुखांच्या मनात येईल तेंव्हा सोडली जाते. जेंव्हा शिवशाहीसारख्या गाड्या रद्द केल्या जातात तेंव्हा आरक्षण केलेल्या प्रवाशांना लालपरी किंवा दुसऱ्या साध्या गाडीमध्ये बसायला सांगितले जाते. एखादी वातानुकुलित गाडी रद्द केली असेल आणि एक दोन तासानंतर दुसरी गाडी सोडली जाणार असेल तर एडजस्टमेंट म्हणून त्या गाडीत जेथे सीट उपलब्ध असेल तेथे बसवले जाते. म्हणजे प्रवाशाने ऑनलाईन केलेले आगावू आरक्षण कामी येत नाही. प्रवाशांने ऑनलाइनद्वारे आरक्षित केलेली सीट त्याला मिळत नाही. जर एखाद्या प्रवाशाला हा मनस्तापाचा पुढील प्रवास करायला नसेल आणि त्याला आगावू केलेल्या आरक्षणाचे पैसे परत हवे असेल तर अर्ज लिहून घेतला जातो आणि आठ दिवसात तुमचे पैसे परत मिळतील म्हणून सांगितले जाते. खरे तर त्याच दिवशी पैसे परत मिळायला हवेत. तसे मात्र होत नाही. ज्या दिवशी तिकीट रद्द त्याच दिवशी पैसे परत केले जावेत.

जर एस.टी. महामंडळ शिवशाहीसारख्या गाड्या वेळेवर सोडत नसेल तर अशा गाड्यांचे आगावू आरक्षण व्यवस्था कशासाठी सुरु ठेवलेली आहे ? गैरसोयीची अशी व्यवस्था बंद का केली जात नाही ? कारण प्रवासांच्या वेळेची आणि पैशाची किंमत होत नसेल तर अशी फसवी सोय काय कामाची ?

दुसरे म्हणजे वातानुकुलित गाड्या सध्या प्रवाशांना खुप त्रासदायक ठरत आहेत. त्याकडे परिवहन मंत्र्यानी वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे. बहुतांश वातानुकुलित गाड्या नावालाच वातानुकुलित आहेत. याशिवाय या गाड्यांमध्ये मोबाईल चार्जिंग पॉइंट आहेत. पण ते निरुपयोगी असतात. इतर गाड्यांपेक्षा शिवशाही, शिवनेरी, शिवाईसारख्या गाड्यांमध्ये सुविधा आहेत म्हणून प्रवाशी या गाड्यांसाठी अधिक रक्कम मोजून प्राधान्य देतो. वास्तव मात्र खुप त्रासदायक आहे. हे प्रकार कुठे तरी थांबले पाहिजेत. एस.टी. च्या रद्दी आणि हलगर्जी कारभाराकडे परिवहन मंत्र्यानी विशेष लक्ष देऊन सर्वसामान्य प्रवाशांच्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजेत.

राज्यातील सर्वच आगारांचा कारभार सध्या रामभरोसे चालत आहे. हे वास्तव सर्वांनाच माहित आहे. सर्वात गैरजिम्मेदार आणि भोंगळ कारभार कुठे चालत असेल तर एक क्रमांकावर पुणे आगाराचे नाव आणि दुसऱ्या क्रमांकावर छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आगाराचे नाव घ्यावे लागेल. सर्वच स्थानकाच्या साफसफाई बाबत न बोललेच बरे. छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बस स्थानकावर दलालाचा जो सुळसुळाट चालू आहे. ते पाहता या ठिकाणाहुन वारंवार गाड्या रद्द होणे, गाडी वेळेवर न सुटणे यामागे स्थानकावर कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांचे या दलाल लोकांशी साठेलोटे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच गाड्या वेळेवर न सोडणे, गाड्या वारंवार रद्द करणे हे प्रकार सतत घडत असतात. प्रवाशांना या दलालांचा खुप त्रास होतो. याकडे कोणीही लक्ष देत नाहीत. याची चौकशी झाली पाहिजे. विशेष म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बस स्थानक कधीही कोसळू शकतो एवढे कमकुवत झालेले आहे. ठिकठिकाणी स्लैबच्या सळाया दिसू लागलेल्या आहेत, प्लास्टर निघालेले आहे. सरकार किंवा एस.टी. महामंडळ मोठ्या दुर्घटनेची प्रतीक्षा करीत आहे की काय ? ऐतिहासिक शहर म्हटले जाते आणि येथील मध्यवर्ती बस स्थानक पाहून शरमेने मान खाली घालावी लागते. या शहराचा कोणी वाली आहे की नाही ? कुठे आहेत मोठमोठ्या थापा मारणारे लोकप्रतिनिधी ? या लोकप्रतिनिधीना थोडीफार लाजशरम असेल तर एकदा मध्यवर्ती बस स्थानकाला भेट देऊन तर पहा.

पुणे येथून जे प्रवाशी विशेषत: वातानुकुलित गाड्यांमधून प्रवास करतात त्यांना बऱ्याच वेळा सीट पुसण्याकरीता घरुन कपडा किंवा कागद घेऊन जावे लागते. याचा अनुभव घ्यायचा असेल तर वाकडेवाडी बस स्थानकाचा जरुर घ्यायला हवा. येथील कर्मचारी प्रवाशांशी अतिशय उर्मठ व्यवहार करतात. पुणे एस.टी. चा कारभार पाहणारे जे वरिष्ठ अधिकारी असतील त्यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते आंधळं दळतंय कुत्र पीठ खातंय हा सन्मान प्रदान करुन त्यांच्या झोपळू कामाचा विशेष सन्मान राज्य सरकारने करायलाच पाहिजे. एकुण काय तर शहरी किंवा ग्रामीण भागातील प्रवाशांना दिलासा मिळेल असे ठोस निर्णय राज्याच्या परिवहन मंत्र्यानी घेऊन एस.टी. चा प्रवास सुखकर करावा.

शिवशाही, शिवनेरी, शिवाईसारख्या वातानुकुलित गाड्यांची दुरावस्था सुधारुन या गाड्या वेळेवर सुटतील याची खबरदारी घ्यावी. ज्या मोठ्या शहरांमधील बस स्थानकांवर दलालांचा सुळसुळाट असेल तेथील आगार प्रमुख, बस स्थानक प्रमुखांवर योग्य कारवाही केली जावी. तसेच जे ड्राइवर गाडी चालवतांना सतत मोबाईलवर बोलतात त्यांची कायमची सुट्टी केली जावी. अपेक्षा करु यात की परिवहन मंत्री महोदय या जनभावनेची योग्य दखल घेऊन एस.टी.चा कारभार सुधारतील.

**– फुलसिंग जाधव**
(सामाजिक कार्यकर्ता)
छत्रपती संभाजीनगर
८९९९०९८२६५

# पृथ्वीराज मोहोळ यंदाचा महाराष्ट्र केसरी खिताबाचा मानकरी

**अहिल्यानगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या ६७ व्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताबासाठी झालेल्या लढतीत पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडचा पराभव करीत विजतेपद पटकाविले. स्पर्धेचा विजेता पृथ्वीराज मोहोळ याला उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते मानाची गदा प्रदान करण्यात आली. राज्यातील क्रीडा विकासाला चालना देतांना प्रत्येक खेळासाठी आवश्यक आर्थिक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही श्री.पवार यांनी दिली.



मॅट विभागात नांदेडचा (मूळचा पुण्याच्या राजगुरुनगरमधील राक्षेवाडीचा) डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे आणि पुणे जिल्ह्याचा पृथ्वीराज मोहोळ यांच्यात लढत झाली. यात पृथ्वीराज मोहोळ विजेता ठरला. माती विभागातून सोलापूर जिल्ह्याचा महेंद्र गायकवाड आणि परभणीचा साकेत यादव यांच्यात अंतिम लढत झाली. यात महेंद्र गायकवाड विजेता ठरला.

अहिल्यानगर येथील वाडिया पार्कमध्ये कै.बलभिम अण्णा जगताप क्रीडानगरीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार संग्राम जगताप, माऊली खटके, काशिनाथ दाते, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, राज्यातील क्रीडा रसिकांनी या स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला. स्पर्धेसाठी पारितोषिकेही मोठी ठेवण्यात आली आहेत. गेले पाच दिवस स्पर्धेच्या भव्य आयोजनाचा आनंद राज्याच्या जनतेला घेता आला. यापुढेदेखील या स्पर्धेचे आयोजन करतांना या स्पर्धेचे दिमाखदार आयोजनाचे आव्हान आयोजकांसमोर असेल. खेळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासनदेखील प्रयत्नशील आहे. प्रत्येक खेळाच्या विकासासाठी राज्य शासन सहकार्य करेल आणि अहिल्यानगरच्या क्रीडा विकासासाठीदेखील आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे भव्य आयोजन झाल्याचे नमूद करून केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, ही मानाची स्पर्धा आहे. स्व.मामासाहेब मोहोळ यांनी या स्पर्धेला सुरूवात केली. त्यानंतर राज्यात कुस्तीच्या वैभवात भर पडून ही परंपरा आणखी पुढे जात आहे. महाराष्ट्र कुस्तीची पंढरी आहे. राज्याने देशाला अनेक मल्ल दिले. महाराष्ट्राच्या तीन मल्लांना शासनाने वर्ग एक दर्जाच्या पदावर नियुक्ती दिली आहे. येत्या काळातही कुस्तीला राजाश्रय मिळेल असा विश्वास व्यक्त करून राज्याची ही परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कुस्ती खेळाला डोपींगसारख्या प्रकाराने गालबोट लागू नये यासाठी येत्या काळात अधिक प्रयत्न होतील असे त्यांनी सांगितले.

# जैनम महिला मंडळाच्या हळदी कुंकु कार्यक्रमात ६०० महिलांची उपस्थिती



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जैनम महिला मंचच्या वतीने विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी येथे हळदी कुकुंचा कार्यकम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यकमामध्ये महिला मंचने योगगुरू न्युमरालॉजीस्ट सचिन कुमार यांचे व्याख्यान आयोजीत केले होते. त्यांनी आपल्या भाषणात १ ते ९ अंकाचे विशेष गुण, सवयी स्वत:हा विषयी व व्यक्तीत्वाची उत्कृष्ट पध्दतीने जान करून दिली. त्याच्या या वक्तव्याचा महिलांनी खुप आनंद घेतला. सुर्यग्रह तारे यांच्यावर अवलंबुन न राहता सायंटीफिक मेमरी टिर्चीगने आयुष्य समजावुन घ्या व पुढे चला. असे त्यांनी सांगीतले.

अंक शास्त्रानुसार दोन जुळया मुलांचे भविष्य एक सारखे नसतात. कारण त्यांचे नाव, जन्माची वेळ, पुढे चालुन मोबाईल नंबर सुध्दा वेगळा होत असतो. नामांक, मुल्यांक वेगवेगळे असतात. अशी माहिती दिली. मुल्यांक १ मध्ये महत्वकांक्षा व प्रतिष्ठा व वैभवशाली जीवन, मुल्यांक २ मध्ये कार्याच्या प्रति शितलता, मुल्यांक ३ मध्ये नेतृत्व व क्षमता व विवेकशिलता, मुल्यांक ४ मध्ये सहिष्णुता व लगन, मुल्यांक ५ मध्ये विश्वसनियता व व्यवहार कुशलता, मुल्यांक ६ मध्ये कलाप्रेमी व सौदर्य उपासक, मुल्यांक ७ मध्ये दर्शनिकता व कल्पनेचा संगम, मुल्यांक ८ मध्ये परिश्रम व निरंतरता, मुल्यांक ९ मध्ये आवेश व शौर्या बददल सांगीतले.

यावेळी शकुंतला देसरडाआहारतज्ञ यांनी आहार विषयी माहिती दिली. महिलांनी आपल्या आहाराकडे विशेष लक्ष दयायचे सांगीतले. कार्यकमासाठी संगीता संचेती व ललीता साकला यांनी प्रायोजक स्विकारले. कार्यकमात ६०० महिलांची उपस्थिती होती. कार्यकम यशस्वी करण्यासाठी भारती बागरेचा, कविता अजमेरा, मंगल पारख, आशा कासलीवाल संगीता कासलीवाल अर्चना दुग्गड यांनी परिश्रम घेतले. कार्यकमाचे सुत्रसंचालन भक्ती संकलेचा यांनी केले. यावेळी मिना पापडीवाल, मंजु पाटणी, सारिका साहुजी, कमलाबाई ओस्तवाल, पुष्पा बाफना, मनिषा भंसाली, शोभा अजमेरा, अनिता पहाडे, सरोज काला, पल्लवी शहा, मेघा सुगंधी मंगल बागरेचा चंचल बाई चोपडा निर्मला मुथा आदीची उपस्थिती होती. यावेळी जैनमब महिला मंचच्या वतीने विविध गेम घेण्यात आले व आनंदपुर्ण उत्साहात हळदी कुंकुचा कार्यकम उत्साहात संपन्न झाला.

# शांतीगिरिजी महाराजांना जगदगुरु पदवी प्रदान; प्रयागराज कुंभमेळ्यात पट्टा अभिषेक सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी अनंत विभूषित समर्थ सदगुरु स्वामी शांतीगिरिजी महाराज यांना श्री शंभू पंचदशनाम जुना आखाड्यांच्या वतीने जगदगुरु पदवी प्रदान करण्यात आली.जगदगुरु पदाचा पट्टा अभिषेक सोहळा अनेक वरिष्ठ संतांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

श्री शंभू पंच दशनाम जुना आखाड्यांच्या सर्व गुरुमुर्तींच्या प्रेरणेने व अखिल भारतीय आखाडा परिषदेचे महामंत्री श्री महंत हरीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत जुना आखाडा पिठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांच्या शुभ हस्ते महाराष्ट्रातील संत परंपरेतील थोर संत कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांचे उत्तराधिकारी अनंत विभूषित सदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांचा जगदगुरु पदाचा लक्षवेधी पट्टा अभिषेक सोहळा प्रयागराज येथील कुंभमेळ्यात अनेक साधू संतांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या उपाधीचे वैशिष्ट्य म्हणजे शांतीगिरिजी महाराज हे महाराष्ट्रातील पहिले संत ज्यांना जुना आखाड्याने जगदगुरु या उपाधीने सन्मानित केले.आद्यगुरु शंकराचार्यांनी निर्मित केलेले अखड्यामध्ये श्री शंभू पंच दशनाम जुना आखाडा ज्यांना आपण नागा साधू म्हणतो. भारतीय संस्कृतीचे रक्षण व प्रचार प्रसार या उद्देशासाठी या आखाड्याची स्थापना आद्य शंकराचार्यांनी केलेली आहे. आखाड्याच्या दृष्टीने निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांनी देशभरातील सर्व आखाड्यामध्ये त्यांच्या निष्काम कार्यामुळे विशेष स्थान मिळवले होते. त्यांचे उत्तराधिकारी म्हणून अनंत विभूषित स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये जप, तप अनुष्ठान, श्रमदान , गोसेवा, गुरुकुल, श्रमदान या परंपरा परिश्रम पूर्वक, श्रद्धापूर्वक अविरतपणे पुढे नेत आहे. यासाठी देशातील प्रमुख ठिकाणी व महाराष्ट्रात जवळपास १०८ पेक्षा जास्त आश्रमाची निर्मिती प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी केली आहे. त्यांच्या या कार्याची विशेष दखल घेऊन शंभू पंच दशनाम जुना आखाड्याने जगदगुरु या पदवीने आज त्यांना सन्मानित केले आहे. महाराष्ट्रातील संत परंपरेचा हा मोठा गौरव असून महाराष्ट्रातील जय बाबाजी भक्त परिवारासह देश भरातील संत-महंत, सामाजिक, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून जगदगुरु शांतीगिरिजी महाराज यांचे अभिनंदन होत आहे.

# सन्मान मातृ शक्तीचा ,जागर स्त्री शक्तीचा, लाडक्या बहिणीचा आवडता कार्यक्रम होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा व हळदी कुंकू समारंभास अभूतपूर्व प्रतिसाद





होम मिनिस्टर स्पर्धेतील विजेती राखी मांडे यांना पैठणीचे बक्षीस प्रदान करण्यात आले. याप्रसंगी सरला मिरकर, खान्देश गर्ल (रिल स्टार) ऋतुजा घोडतुरे व आदी मान्यवर.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

१ फेब्रुवारी २०२५ रोजी एन-७ येथील त्रिदेवता मंदिर जिगीषा हायस्कूल समोर श्री राजेश मिरकर व सौ सरला मिरकर आयोजित सन्मान मातृ शक्तीचा , जागर स्त्री शक्तीचा, लाडक्या बहिणीचा आवडता कार्यक्रम होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा व हळदी कुंकू समारंभास जवळपास एक हजार म हिलांनी सहभाग नोंदविला या वेळी न्यू होम मिनिस्टर फेम श्रद्धा देवचक्के यांनी पारंपारिक उखाणे, धमाल गाणी, मजेदार खेळ, म हिला भगिनी यांच्या सुप्त कलागुणांणा वाव देणाऱ्या वेगवेगळ्या मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.ना.अतुलजी सावे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, पारंपारिक ऊर्जा मंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी महापौर श्री.बापू घडामोडे, श्री.विश्वनाथ



स्वामी, श्री.शिवाजी दांडगे, सौ.माधुरीताई अदवंत, यांची उपस्थिती होती विजेत्या म हिला भगिनींना पैठणी व आकर्षक पारितोषिके माण्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

विजेत्या महिला खालील प्रमाणे- १) राखी मांडे, २) वैशाली मांडे, ३) मनीषा कापसे, ४) भारती बांगड. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेखा ताई पाटील, सरिता घोडतुरे, संगीता राऊत, राणी बेहडे, नंदिनी बिराजदार, जयश्री निकम, दिपाली खडकिकर, रत्ना राऊत, चित्रा लक्कस,अनिता चिकटे, लतिका डांगे, तारा पंडित, रूपाली टेकाळे, अनिता बारस्कर, मंदाकिनी जगताप, छाया मिरकर, रेखा मिरकर, रचना जयस्वाल, मनीषा मुंडे, वर्षा साळुंखे, लक्ष्मी गायकवाड, अनिता तुपे, नलिनी कुलकर्णी, इंदू अरोरा, सुरेखा मुरकुटे, सुनिता हुंडीवाले, मंदा हिंगमिरे, रंजना सामक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रिल स्टार ऋतुजा घोडतुरे हिची उपस्थिती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सन्मान मातृ शक्तीचा, जागर स्त्री शक्तीचा या उपक्रमाव्दारे हळदी-कुंकू समारंभ एन-७ छत्रपती संभाजीनगर येथे १ फेब्रुवारी (शनिवारी) आयोजित करण्यात आला होता. यात अनेक महिलांनी सहभाग घेतला. तसेच होम मिनिस्टर खेळाचा आनंदही लुटला. यादरम्यान त्यांना वाणाचेही वाटप करण्यात आले. अनेक महिलांनी या सर्व खेळांमध्ये पहिल्यांदाच सहभाग घेतला होता. कार्यक्रमात रिल स्टार खान्देशी गर्ल ऋतुजा घोडतुरे हिनेही हजेरी लावली. तिचा आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.

महिलांमध्ये जावून ऋतुजाने अहिराणी गाण्यावर मनसोक्त डान्स केला. त्यामुळे सर्व वातावरणात उत्साह संचारला होता. महिलांही जोमात, लहान मुलीही सेल्फी काढण्यासाठी पुढे येवू लागले. ऋतुजाने जा खुशिमा राहिजो तु या गीतातील एक डायलॉगही म्हणून दाखवला यास महिलांनीही दाद दिली. महिलांनी तिला अहिराणी गाण्यावर नृत्य करण्यास सांगितले व तिने देखील महिलांच्या विनंतीला मान देवून जास्त आडेवेडे न घेता होकार दर्शविला व वातावरणात उत्साह आणला.

# स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांनी दिला गीतेचा संदेश बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयात कार्यक्रम



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील बेगमपुरा भागात असलेल्या ज्ञानेश विद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'निष्काम कर्मयोग आणि प्रेम' या संदर्भात गीतेतील संदेश जनतेपर्यंत पोहोचवला. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत कृष्णलीला सादर करण्यात आली.

शहरातील बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयाने संत एकनाथ रंग मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय सिसोदे, सहसचिव श्रीमंत सिसोदे, सचिव यशोद सिसोदे, कोषाध्यक्ष तुषार शिसोदे, प्रभाकर मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

इंग्रजी माध्यमातील शाळांच्या स्पर्धेत मराठी माध्यमातील विद्यार्थी देखील कोणत्याही स्थितीत कमी पडत नाहीत, मागे राहत नाहीत, हे यातून विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. शाळेतील शिक्षकांनी योग्य संस्कार केल्यामुळे हे विद्यार्थी निश्चितपणे समाजात आपला ठसा, उमटवतील असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या सर्व पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. श्रीकृष्ण अवताराचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.



छत्रपती संभाजीनगर – दि. ३० जानेवारी रोजी मा.मिलिंद दुसाने (जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर) यांना एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने शाल आणि पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनचे अध्यक्ष, रतनकुमार साळवे, सचिव– संजय सोनखेडे, कार्याध्यक्ष, रशपालसिंग अट्टल, जिल्हाकार्यध्यक्ष, प्रल्हाद गवळी, अट्टलमतचे कार्यकारी संपादक दिनेश परदेशी, श्रीरंग ससाणे, नितीन दांडगे, प्रकाश खजिनकर, आदी पत्रकार उपस्थित होते.

## जगतगुरु तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



शिवराणा सेवा संघ व शिवराणा वाचनालय पुंडलिकनगर वतीने संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतीमा पुजन करण्यात आले. योगेश वाणी यांच्या हस्ते यावेळी एल डी ताटू यांनी सांगितले की आदर्श भक्ती आणि जिवन जगताना सेवा कशी करावी तुकाराम महाराज यांच्या एका व्यापक आदर्श निर्माण केला ते म्हणाले जे का रजले गांजले त्याशी म्हणा आपले व देविदास जाधव यांनी मनोगत व्यक्त केले जगत गुरु तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम येथे होतोय जात धर्म पंथ पलीकडे मानवता हाच खरा धर्म आहे. यावेळी प्रकाश देशमुख देवकाते शिवाजी, थोरात दामोदर, आकाश घुनावत, सचिन घुनावत आदी सहभागी झाले.

# योगेश प्रकाश सुरवाडे यांना पीएचडी प्रदान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, ज्ञान स्रोत केंद्रात (विद्यापीठ ग्रंथालय) कार्यरत असलेले श्री. योगेश प्रकाश सुरवाडे यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पीएचडी प्रदान केली आहे.

Library Automation using SOUL Software in Academic Libraries affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University: An Evaluation Study हा पीएचडी विषय असून डॉ. दया पाटील (दळवे) यांनी त्यांना संशोधनाकरिता मार्गदर्शन केले असून त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग प्रमुख व आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली खापर्डे यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच श्री. योगेश सुरवाडे यांना पीएचडी प्रदान झाल्याबद्दल विवेकानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. टी.आर. पाटील, वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. विणा कांबळे , जेईस महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. मनीषा सुतार, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, जालना चे ग्रंथपाल डॉ. हितेंद्र पाटील, श्री. शॅमुवेल बत्तीसे, डॉ. विकास टाचले, हिना बावस्कर यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शिवजन्मोत्सव समिती कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी प्रवीण जाधव






प्रवीण जाधव
अध्यक्ष


डॉ.डी.एस. काटे
कार्याध्यक्ष


डॉ.जीवन राजपूत
स्वागताध्यक्ष


मनीषा भन्साळी,
उपाध्यक्ष


नवीन ओबेरॉय
उपाध्यक्ष

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

'शिव जन्मोत्सव समिती छत्रपती संभाजीनगर'ची बैठक २८ जानेवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीत संस्थापक अध्यक्ष मा. नितीन भैय्या कदम व संस्थापक सचिव मा.निवृत्ती डक पाटील यांच्या उपस्थितीत शिव जन्मोत्सव समिती २०२५ छत्रपती संभाजीनगर अध्यक्षपदी माझी निवड झाल्यावर या समितीची कार्यकारिणी पत्रकार परिषदेत घोषित करून कार्यक्रम पत्रिका घोषित करण्यात आली आहे.

अध्यक्ष–प्रवीण जाधव.कार्याध्यक्ष–डॉ. डी. एस. काटे साहेब.स्वागताध्यक्ष–डॉ. जीवन राजपूत सर व उर्वरित पदाधिकारी. याप्रसंगी उपस्थित उपाध्यक्ष–सौ मनीषा ताई भन्साळी, उपाध्यक्ष नवीन ओबेरॉय, सोमनाथ देवकर पाटील,कोषाध्यक्ष–नितीनजी अजमेरा. सरचिटणीस–निलेश धस.सचिव–सौ.राखीताई सुरडकर, ॲड.सुवर्णा ताई मोहिते. सहसचिव–विकासभैय्या सोनार आदींची उपस्थिती होती.

## शिव जन्मोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

अध्यक्ष प्रविण जाधव यांनी नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातुन आयोजित केले जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यात १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता समितीच्या वतीने संत भगवान बाबा अनाथ आश्रम येथे अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता क्रांतीचौक ते वेरूळ या दरम्यान वाहन रॅली काढण्यात येणार आहे. ही वाहन रॅली ही शहाजी राजे भोसले गढी येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी समितीचे सदस्य व पदाधिकारी हे गढी परिसराची स्वच्छता करणार आहेत. याशिवाय दुपारी ३ वाजेच्या दरम्यान शहरातील ११ शिवस्मारकाचे दुग्धाभिषेक आयोजित करण्यात आले आहे. तसेच क्रांतीचौकात सायंकाळी दिपोत्सव होईल. रात्री १२ वाजेच्या सुमारास पाळणा व आतिषबाजी केली जाणार आहे. १९ फेब्रुवारीला क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सकाळी ११ वाजता शाहिरी पोवाडा, सह दुपारी १२ वाजेच्या दरम्यान अन्नदानाच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. याशिवाय दुपारी ४ वाजेच्या दरम्यान नवनिर्वाचित आमदार खासदार मंत्री यांचाही सत्कार कार्यक्रम क्रांतीचौक येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती जाधव यांनी दिली.

### पावती विरहित शिवजयंती

“ यंदाची शिवजयंती ही सर्वच पद्धतीने आगळीवेगळी करण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात येईल. तसेच ही शिवजयंती पावती विरहित देखील असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ही स्मरणीय करण्यासाठी समितीपूर्ण ताकदीने कामाला लागली आहे. मी यापूर्वी ही महापुरूषांच्या जयंतीचा अध्यक्ष होतो तर तेथेही पावती विरहितच समारोह साजरे झाले आहे. सर्व जनमाणसाच्या स्मरणात राहील असेच नियोजन समितीकडून होईल.

**-प्रवीण जाधव**
शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष

# लायन्स क्लब - द वन तर्फे लायन्स आयडॉल - गरजू विद्यार्थ्यांना संगणक देण्यासाठी उभारणार निधी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील लायन्स क्लब ऑफ द वन तर्फे शैक्षणिक कामासाठी निधी उभारण्यासाठी लायन्स आयडॉल – २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रांत ३२३४ एच २ मधील सर्व लायन्स क्लबचे सदस्य सहभागी होऊ शकतात. याद्वारे जमा झालेल्या पैशातून संगणक घेऊन दिले जाणार आहेत, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष डॉ. अश्विनी जयस्वाल यांनी दिली.




त्यांनी सांगितले की, ही स्पर्धा सर्व लायन्स सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी खुली असणार आहे. यामध्ये प्री क्वालिफिएड, क्वालिफिएड आणि ग्रँड फिनाले असे तीन राऊंड होतील. प्री क्वालिफिएड राऊंड मध्ये एक प्री रेकॉर्डेड व्हिडिओ १२ फेब्रुवारी पूर्वी पाठवावा लागेल. यात वोकल, सॉन्ग सिलेक्शन, वर्सेटिलिटी बघून निवडलेल्या सहभागी सदस्यांची निवड क्वालिफिएड राऊंड होईल. यामध्ये तीन मिनिटांचा एक व्हिडिओ शेअर करावा लागेल. यामध्ये गाणे मराठी किंवा इंग्लिश असावे लागेल. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांना वेळोवेळी माहिती दिली जाईल, असेही त्या म्हणाल्या. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. बालाजी बिरादार, अनण्या उपाध्याय, अभिषेक राज, शुभांकर डांगे, आशीष जयस्वाल आणि पूर्वा जयस्वाल परिश्रम घेत आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन– ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.